# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

## कुलसचिवाचे कार्यालय


दिपक जुनघरे
कुलसचिव(का)
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली –४४२६०५(महा.)
फोन:07132.216554, 223104 फॅक्स : 07132.2226
Email : registrar.gondwanauniversity@gmail.com
web: www.unigug.org
web: gondwana.digitaluniversity.ac


क्रमांक/गो.वि./ 638/२०१७ दिनांक : ०९/१०/२०१७

प्रति,
मा. प्राचार्य,
विद्यापीठाशी संलग्नित सर्व (Non A.I.C.T.E.) महाविद्यालये.

विषय :– माहीती व्यवस्थापण प्रणाली (M.I.S.) उच्च शिक्षण, पुणे संदर्भ वर्ष २०१७–१८ बाबतची माहिती (www.dhemis.maharashtra.gov.in) या संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करण्याबाबत.

संदर्भ:–१) मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे ई–मेल व पत्र दिनांक ७ ऑक्टो २०१७

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये संलग्नित सर्व महाविद्यालये (Non AICTE) महाविद्यालयांना कळविण्यात येते की, M.I.S. वर्ष २०१७–१८ बाबतची माहिती दिनांक ३१/१२/२०१७ पर्यंत ऑनलाईन सादर करावयाची आहे.

त्याअनुषंगाने शासनाने, संदर्भांकित ई–मेल नुसार माहिती (www.dhemis.maharashtra.gov.in) या संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करण्याबाबत कळविलेले आहे. करीता माहीती ऑनलाईन भरून शासनास तसेच विद्यापीठास सहकार्य करावे. माहीती सादर करतांना तांत्रीक अडचणी आल्यास संगणक विभाग (०७१३२–२२३१०८) या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

कुलसचिव (का.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण),
## मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१

कार्यालयाचे संकेतस्थळ :- www.dhepune.gov.in कार्यालयीन ई-मेल:-stat.dhepune@nic.in
फोन क्र:- ०२०/६५००१०१६/६५००११७३/ फॅक्स क्र:-०२०/२६१११११५३

---

क्र.उशिसं/सांख्यिकी/एमआयएस/२०१७-१८/ 99500 दिनांक - ४.१०.२०१७
- 7 OCT 2017

प्रति,

१) सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे/मुंबई/नागपूर/अमरावती/औरंगाबाद/कोल्हापूर/सोलापूर/नांदेड/जळगांव/पनवेल/

२) कुलसचिव

१) सिंबायोसिस विश्र्वविदयालय, सेनापती बापट रस्ता, पुणे
२) स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड
३) उत्तर महाराष्ट्र विदयापीठ, जळगांव
४) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ, नाशिक
५) गोखले अर्थशास्त्र संस्था, डेक्कन जिमखाना, पुणे
६) टिळक महाराष्ट्र विदयापीठ, गुलटेकडी, पुणे
७) भारती विदयापीठ, पुणे
८) शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर
९) कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविदयालय, रामटेक जि.नागपूर
१०) सोलापूर विदयापीठ, सोलापूर
११) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद
१२) संत गाडगेबाबा अमरावती विदयापीठ, अमरावती
१३) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विदयापीठ, मुंबई
१४) डेक्कन अभिमत विदयापीठ, येरवडा, पुणे
१५) मुंबई विदयापीठ, मुंबई
१६) सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ, पुणे
१७) गोंडवाना विदयापीठ, गडचिरोली
१८) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विदयापीठ, नागपूर
१९) नॅशनल लॉ युनिर्व्हसिटी, मुंबई
२०) नॅशनल लॉ युनिर्व्हसिटी, औरंगाबाद
२१) नॅशनल लॉ युनिर्व्हसिटी, नागपूर

**विषय - माहिती व्यवस्थापन प्रणाली (DHEMIS)**
**वेबपोर्टलवर सन २०१७-१८ या वर्षाची माहिती नोंदणे बाबत.**

उच्च शिक्षण संचालनालयाने www.dhemis.maharashtra.gov.in हे एमआयएस माहिती नोंदणीचे वेबपोर्टल विकसित केले आहे. संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व सहसंचालक कार्यालये, विदयापीठे आणि संलग्नित महाविदयालये सन २०१३-१४ पासून हया वेबपोर्टलवर ऑनलाईन पध्दतीनुसार प्रत्येक वर्षाकरीता दिनांक ३० सप्टेंबर हया संदर्भ दिवसाची प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची माहिती नोंदवित आहेत हे आपणांस विदित आहेच.

२. संचालनालयाकडुन सन २०१७-१८ हया वर्षाच्या माहिती नोंदणीची वेबलिंक वरील वेबपोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या अनुषंगाने सहसंचालक कार्यालये, सर्व अकृषी विदयापीठे आणि संलग्नित सर्व महाविदयालयांनी दिनांक ३०.९.२०१७ या संदर्भ दिवसाची प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची माहिती वेबपोर्टलवर नोंदवावयाची आहे. **माहिती नोंदणीचे काम सर्व सहसंचालक कार्यालये, विदयापीठे आणि संलग्नित महाविदयालयांनी दिनांक ३१.१२.२०१७ अखेर निश्चितपणे पूर्ण करावयाचे आहे.** त्यानंतर नोंदलेल्या माहितीची वैधता पडताळणी करुन व आवश्यक तेथे दुरुस्त्या करुन माहिती नोंदणीचे सर्व काम दिनांक ३१.१.२०१८ अखेर पूर्ण करावयाचे आहे. सन २०१७-१८ च्या माहिती नोंदणीच्या कामाचा अहवाल दिनांक ५.२.२०१८ पर्यंत संचालनालयाकडुन शासनाला सादर करावयाचा असल्याने वरील माहिती नोंदणीचे काम विहित वेळेत पूर्ण होईल यादृष्टीने सर्व सहसंचालक कार्यालये व विदयापीठांनी कामाचे संनियंत्रण करावे.

(कृमाप)

३. सहसंचालक कार्यालयांचे, विभागातील अनुदानित महाविदयालयांवर थेट नियंत्रण असल्यामुळे त्यांनी आपल्या विभागातील अनुदानित महाविदयालयांच्या आणि आपल्या सहसंचालक कार्यालयाच्या एमआयएस माहिती नोंदणीचे काम विहित मुदतीत पूर्ण करुन घ्यावे. विदयापीठांनी आपल्या विदयापीठातील नियुक्त करण्यात आलेल्या एमआयएस नोडल अधिका-यांकडुन आपल्या विदयापीठाचे माहिती नोंदणीचे काम विहित मुदतीत पूर्ण करुन घ्यावे. विदयापीठांशी संलग्नित असलेल्या महाविदयालयातील माहिती नोंदणीबाबत विदयापीठस्तरावरुन स्वतंत्र पत्र, ई-मेल, दूरध्वनीव्दारे संबंधित महाविदयालयाच्या प्राचार्यांना कळविण्यात यावे आणि काम पूर्ण करुन घेण्यात यावे.

**४. वेबपोर्टलवर अदयाप नोंदणी झाली नसलेल्या महाविदयालयांकरीता -**

सन २०१७-१८ हया वर्षात विदयापीठाशी नव्याने संलग्नित असलेल्या तथापि एमआयएस वेबपोर्टलवर अदयाप नोंदणी झाली नसलेल्या महाविदयालयांची नोंदणी वेबपोर्टलवर करुन घेणे आवश्यक आहे. या अनुषंगाने संबंधित महाविदयालयांशी पत्र व दूरध्वनीव्दारे संपर्क साधून वेबपोर्टलवर नोंदणी करण्यात यावी. तसेच सन २०१७-१८ यावर्षात बंद असलेली अथवा असंलग्नित असलेली (De-affiliate) महाविदयालयांची यादी संचालनालयास सादर करण्यात यावी. सदरील महाविदयालये सिस्टिममधून डिॲफिलिट करण्यात येतील ज्यामुळे संबंधित महाविदयालयांकडे माहिती भरण्याबाबत पाठपुरावा करण्याची आवश्यकता राहणार नाही.

**५. महाविदयालयांची माहिती प्राप्त झालेबाबतचे प्रमाणपत्र देणेबाबत -**

सर्व महाविदयालयांकडुन वेबपोर्टलवर अचूक व वैध माहिती विहित मुदतीत नोंदवून घेण्याकरीता विदयापीठामार्फत संनियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. **या अनुषंगाने एमआयएस वेबपोर्टलवर माहिती भरलेल्या महाविदयालयांचीच कामे (उदा. संलग्नीकरण, परीक्षानिकाल व अनुषंगिक कामे) विदयापीठातील इतर शाखा/विभागामार्फत पुढील कार्यवाहीकरीता स्विकारली जावीत.** याबाबत संबंधित शाखेच्या प्रमुखांना कळविण्यात यावे. याकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

महाविदयालयांनी सन २०१७-१८ ची माहिती व्यवस्थितरित्या नोंदल्याचे तसेच ती पडताळून बरोबर असल्याचे प्रमाणपत्र संबंधित महाविदयालयाच्या प्राचार्यांकडुन घेण्यात यावे. सदरील प्रमाणपत्राची एक प्रत संचालनालयास वरील ई-मेलव्दारे सादर करण्यात यावी. महाविदयालयांकडुन प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर विदयापीठाच्या एमआयएस नोडल अधिका-यांनी संबंधित महाविदयालयास सन २०१७-१८ च्या माहिती नोंदणीचे काम पूर्ण केल्याबाबतचे आणि महाविदयालयाची विदयापीठातील इतर शाखा/विभागांशी संबंधित असलेली अथवा वर नमूद केलेली कामे स्विकारण्यास हरकत नसल्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र दयावे.

**विदयापीठाच्या एमआयएस नोडल अधिका-यांचे माहिती नोंदणीचे प्रमाणपत्र संबंधित महाविदयालयाने सादर केल्यानंतर विदयापीठातील इतर शाखा/विभाग यांचेकडुन संबंधित महाविदयालयाची वन नमूद केलेली कामे पुढील कार्यवाहीसाठी स्विकारण्यात यावीत.** ज्यामुळे महाविदयालयांकडुन केल्या जाणा-या माहिती नोंदणीच्या कामावर योग्य सनियंत्रण राखणे शक्य होईल. वरील दोन्ही प्रमाणपत्राचा नमुना सोबत जोडला आहे.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे

(महाविदयालयांकडुन माहिती भरल्याबाबत प्राप्त करावयाचे)

## -: प्रमाणपत्र :-

प्रमाणित करण्यात येते की, माहिती व्यवस्थापन प्रणाली (एम.आय.एस)

सन २०१७-१८ या वेबपोर्टलवर -------------------------------------------------------------------- हया महाविदयालयाची शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची सर्व माहिती नोंदविली आहे. सदरील माहितीची पडताळणी करण्यात आली असून ती बरोबर व वैध असल्याचे आढळून आले आहे. त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी आहे.

(स्वाक्षरी)

प्राचार्य

महाविदयालयाचे नांव व सील

दिनांक -

ठिकाण -

---

(महाविदयालयांना विदयापीठाकडुन दयावयाचे ना- हरकत प्रमाणपत्र )

## -: प्रमाणपत्र :-

प्रमाणित करण्यात येते की, माहिती व्यवस्थापन प्रणाली (एम.आय.एस)

सन २०१७-१८ या वेबपोर्टलवर -------------------------------------------------------------------- हया महाविदयालयाची शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची सर्व माहिती नोंदविली आहे. महाविदयालयाकडे कोणतीही माहिती प्रलंबित नाही. सबब सदरील महाविदयालयाची कामे विदयापीठाच्या संबंधित शाखेकडुन पुढील कार्यवाहीकरीता स्विकारण्यास हरकत नाही.

दिनांक -

ठिकाण

विदयापीठ नोडल अधिकारी

माहिती व्यवस्थापन प्रणालीकरीता

(विदयापीठाचे नांव)

Gmail

**PRAMOD KRISHNA <asst.programmer.pk@gmail.com>**

# माहिती व्य व्यवस्थापन प्रणाली (DHEMIS) वेबपोर्टल सन २०१७-१८ या वर्षाची माहिती नोंदणेबाबत.

1 message

**"सांख्यिकी शाखा, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष् =?utf-8?B?4KSf4KWN4KSwlOCksOCkvuCknOCljeCkryw** <stat.dhepune@nic.in> Mon, Oct 9, 2017 at 1:19 PM

Reply-To: stat.dhepune@gov.in

To: rsinghamt@hotmail.com, bcud.office@bamu.ac.in, asst.programmer.pk@gmail.com, nmu.jalgaon@gmail.com, statcell@unishivaji.ac.in, supt.statunit@gmail.com, registrar@sndt.ac.in, rahul@mnlumumbai.edu.in, kksustata@gmail.com, registrar@nlunagpur.ac.in, rtmnu.nodal@gmail.com, systemexpertsrtmun@gmail.com, bhaurkar_bk@ycmou.digitaluniversity.ac, msbagwan@gmail.com, dirdeccancollege@gmail.com, aindram@yahoo.com, sddhole@gmail.com, registrar@siu.edu.in, registrar@tmv.edu.in, shinde_ashok2007@rediffmail.com, mnlaaurangabad@gmail.com

Sir,

PFA.

--

आपला विश्वासू !

**सांख्यिकी अधिकारी ,**
**सांख्यिकी शाखा,**
**उच्च शिक्षण संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**
**सेन्ट्रल बिल्डिंग,**
**पुणे - ४११००१**
**दुरध्वनी क्र . (०२०)६५००११७३/६५००१०१६.**

**DHE_MIS_2017-18.pdf**
1932K